## इचलकरंजी महानगरपालिका
## महिला व बालकल्याण विभाग
## दरपत्रकाची नोटीस (पहिली मुदतवाढ)

इचलकरंजी महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागा अंतर्गत इमपा मालकीच्या प्राथमिक शाळांना क्रिडा साहित्य / साधने पुरविणे अंदाजपत्रक रक्कम रु. ५,९५,८३०/- कामाचे दुहेरी लिफाफा पध्दतीने सिलबंद दरपत्रक/कोटेशन व्यक्ती / संस्थांकडून दि. ६/३/२०२४ ते दि. १२/३/२०२४ अखेर पर्यंत इचलकरंजी महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर मागविणेत आली होती. तथापी याकामी एकही दरपत्रक / कोटेशन प्राप्त न झालेने सदर कामास पहिली मुदतवाढ देणेत येत आहे.

| अ.क्र. | साहित्य तपशिल | संख्या | दर | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | हॉकिस्टीक | २५२ | ५०० | १,२६,०००.०० |
| २ | हॉकि बॉल | १२६ | १३० | १६,३८०.०० |
| ३ | फुटबॉल | ४४ | ४०० | १७,६००.०० |
| ४ | टेनिकॉईट रिंग | ५१ | ७५ | ३,८२५.०० |
| ५ | भाला | १४ | १८० | २,५२०.०० |
| ६ | बुध्दीबळ | ८१ | १५० | १२,१५०.०० |
| ७ | खो-खो कोन (प्लास्टीक) | २१६ | ३५ | ७,५६०.०० |
| ८ | हॉलिबॉल | ३५ | ४०० | १४,०००.०० |
| ९ | गोळा | २६ | ३५० | ९,१००.०० |
| १० | थाळी | ४० | १३० | ५,२००.०० |
| ११ | थ्रोबॉल | ३७ | ७५० | २७,७५०.०० |
| १२ | खो-खो पोल | २० | २००० | ४०,०००.०० |
| १३ | डॉच बॉल | ५ | ५८० | २,९००.०० |
| १४ | क्रिकेट संच (२ बॅट, ६ स्टंप, ६ बॉल) | १९ | ४५०० | ८५,५००.०० |
| १५ | प्रथमोपचार पेटी | ३५ | ५५० | १९,२५०.०० |
| १६ | दोरी उड्या | ८५५ | १४५ | १,२३,९७५.०० |
| १७ | स्टील क्रिडा शिट्टी | ७० | ६० | ४,२००.०० |
| १८ | लाकडी डंबेल्स | १०० | ६५ | ६,५००.०० |
| १९ | झांझपथक संच<br>( १ ढोल,१ ताशा, १५ झांझ संच) | ५ | ४०८० | २०,४००.०० |
| २० | बास्केट बॉल | २ | ७८० | १,५६०.०० |
| २१ | उंच उडी खांब | १ | १७०० | १७००.०० |
| २२ | फ्रिजबी | २७ | १३० | ३,५१०.०० |
| २३ | लेझिम | ३०० | १३० | ३९,०००.०० |
| २४ | मैदान आखणे दोरी | ३५ | १५० | ५,२५०.०० |
| | **एकुण** | **GST व वाहतुकीसह** | | **५,९५,८३०.००** |

वरील कामी दुहेरी लिफाफा पध्दतीचा अवलंब करणेत येत आहे.

**अ) लिफाफा क्रं.१ मध्ये खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.**

१) बयाणा रक्कम रु. ६,०००/- इचलकरंजी महानगरपालिका हद्दीतील राष्ट्रीयकृत /शेडयूल्ड/सार्वजनिक क्षेत्रातील बॅंकेच्या शाखेतील कामाची मुदत अधिक ६ महिने इतक्या कालावधीचा धनाकर्ष (डी.डी.) मा.आयुक्त, इचलकरंजी महानगरपालिका यांचे नावाने काढणेचा आहे.

२) व्यक्ती / संस्था नोंदणी प्रमाणपत्र

४) स्वत: मक्ता घेवून केलेल्या समतुल्य कामाचा अनुभव असलेली समर्थनीय कागदपत्रे.

५) पुरवठाधारकाचे पॅन कार्ड याची सत्य प्रत.
६) वित्तीय समर्थता (कामाच्या अंदाजपत्रकानुसार) बँक सॉलव्हन्सी / IT रिटर्न ३ वर्षे
७) मक्तेदाराचा ईपीएफ अकौंट क्रमांक असणे आवश्यक. (आवश्यक असल्यास)
८) नविन जी.एस.टी.कर प्रणालीनुसार निविदा भरणेची आहे. जी.एस.टी. रजिस्ट्रेशन आवश्यक आहे.
९) भारतात/राज्यात कोणत्याही शासकीय/निमशासकीय विभागाकडून काळा यादीत टाकले नसलेबाबतचे स्वयंघोषणा पत्र.
१०) पदाधिकारी सहभाग नसलेबाबतचे प्रतिज्ञापत्र
११) निविदेसोबत जोडलेली सर्व कागदपत्रे खरी असलेबाबतचे (फॉर्म १B १०० रु. च्या स्टँप पेपरवर जोडणेचे आहे)

**ब) लिफाफा क्रं.२ मध्ये खालील कागदपत्रे जोडावेत.**

१) दरपत्रक / कोटेशन साक्षांकीत केलेले असावे.
२) एस्टीमेट पेक्षा कमी दराच्या निविदा असल्यास नियमाप्रमाणे राष्ट्रीयकृत /शेडयूल्ड/सार्वजनिक क्षेत्रातील बँकेचा डी.डी. जोडावा. वरील लिफाफा क्र.१ व लिफाफा क्र.२ हे दोन्ही लिफाफे सिल करुन ते एका लिफाफ्यात सिल बंद करुन या सर्व लिफाफ्यांवर कामाचे नांव, पुरवठाधारकाचे नांव स्पष्टपणे नमूद करुन सदरील लिफाफा मुदतीत बारनिधी विभागाकडे देणेत यावे.

(तैमूर मुलाणी)
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका

---

अटी / शर्ती-

१. सदर जाहिर प्रकटन http://ichalkaranjimnp.in या इचलकरंजी महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर दि.१२ /०३ /२०२४ रोजी पासून दि.१४ /०३ /२०२४ पर्यंत ऑनलाईन पहावयास मिळतील.
२. इचलकरंजी महानगरपालिकेच्या बारनिशी विभागाकडे सिलबंद लिफाफामध्ये दरपत्रक / कोटेशन सादर करण्याची अंतिम दि. १४ / ३ / २०२४ रोजी सायं.६:०० वाजेपर्यंत राहील.
३. शक्य झालेस प्राप्त दरपत्रक / कोटेशन दि.१४ /३/२०२४ दुपारी ४.३० वाजता उपस्थित पुरवठाधारक यांचे समोर उघडणेत येईल.
४. कोणतेही दरपत्रक /कोटेशन मंजूर अथवा नामंजूर करणेचे अधिकार महानगरपालिकेने राखून ठेवलेले आहेत. त्याची कोणतीही कारणे दिली जाणार नाही.
५. वरील नमुद साहित्य हे १४ वर्षे च्या आतील गटातील विद्यार्थ्यांना आवश्यक आहे
६. ज्यांचे दरपत्रक / कोटेशन मंजूर होईल त्यांचे बिलातून ९% इतकी रक्कम सिक्युरिटी झिपॉझिट वजा करुन घेतली जाईल व काम पूर्ण झालेनंतर ६ महिनेनंतर परत केली जाईल.
७. दरपत्रक / कोटेशन स्विकृत केल्याचे पात्र संस्थेस इकडून लेखी कळविणेत येईल. त्यानुसार योग्य त्या स्टँपवर विहीत नमुन्यात लेखी करारनामा स्वखर्चाने करुन देणेचा आहे. व आवश्यक त्या बयाणा व सुरक्षा रक्कमेचा भरणा करणे संस्थेस बंधनकारक राहील.
८. अर्जदार/ संस्थेने सादर केलेल्या सर्व कागदपत्रातील प्रत्येक पानावर त्यांची सही व शिक्का तसेच पानांकन असणे आवश्यक आहे. सर्व कागदपत्रांवर सही व शिक्का नसल्यास अर्जदाराचा विचार करता येणार नाही.
९. साहित्य पुरवठा करण्यासाठी मागविण्यात आलेले दरपत्रक / कोटेशन अर्ज कुठलेही लेखी अथवा तोंडी कारण न देता स्विकृत करणे, नाकारणे किंवा रद्द करणे याबाबतचे सर्व अधिकार मा. आयुक्तसो / उपायुक्तसो यांना राहील.
१०. निकृष्ट दर्जाचे साहित्य पुरविल्यामुळे किंवा अन्य कारणास्तव पुरवठादार संस्थेस दंड आकारण्यात आल्यास, दंडाच्या रक्कमेची वसुली ही प्रथम त्यांचे देयकामधुन करण्यात येईल व दंडाची रक्कम देयकापेक्षा अधिक झाल्यास त्याची वसुली सुरक्षा अनामत रक्कमेतून करण्यात येईल.
११. वरील अटी / शर्तीमध्ये आवश्यक ती वाढ करणे / सुधारणा करणे याबाबतचा अधिकार मा. आयुक्तसो व मा. उपायुक्तसो यांना राहतील.

१२. उपरोक्त योजनेच्या अमंलबजावणीच्या अनुषंगाने संबंधित संस्थेस प्राप्त होणा-या रक्कमेवर आयकर विभाग व इतर विभागाकडून वेळोवेळी लागू करण्यात आलेला कर पुरवठाधारक यांनी संबंधित विभागास भरणे / कपात करुन घेणे बंधनकारक असेल.

१३. सदर कामी सर्व शासकीय कर भरणेचे जबाबदारी पुरवठाधारक यांची राहील.

१४.याकामी महानगरपालिकाकडे उपलब्ध असलेल्या निधीप्रमाणे देयक आदा केले जाईल.विलंबाबाबत कोणतेही व्याज तसेच याबाबत कोणत्याही न्यायालयात दाद मागता येणार नाही.

१५. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील सर्व संबधित तरतुदी लागु राहतील.

**(तैमूर मुलाणी)**
उपायुक्त
इचलकरंजी महानगरपालिका